नि.फौ.ख.क्र.९८/२०२३
शासन विरुध्द सचिन
नि.क्र.१६ पुढे सुरु

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ चा पुढील सरतपास शपथेवर सुरु.**
**सरकार पक्षातर्फे विधिज्ञ श्रीमती एस.आर.जाधव**

आता मला मुद्देमाल क्र. २७/२०२४ वरील लेबल दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदरील लेबल **नि.क्र.१७** वर आहे. त्यावेळी मंगल यादव यांच्या रानात फोटो काढण्यात आले होते. आता मला एकुण तीन फोटो दाखविण्यात आले. ते तेच असुन ते **आर्टीकल ए ते सी** वर आहेत. आता मला मुद्देमाल क्र. २७/२०२४ वरील पिंपळाची फांदी दाखविण्यात आली. ती तीच असुन तिने मंगल यादव यांना मारहाण करण्यात आली होती. ती माझ्यासमक्ष जप्त करण्यात आली होती. ती **आर्टीकल डी** वर आहे.

सरतपास पुर्ण

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री डी. पी. धुमाळ**

आर्टीकल डी वरील फांदी कुणी आणली या बाबत मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की आर्टीकल ए ते सी वरील फोटो काढतेवेळी मी तेथे हजर असल्याचे केवळ फिर्यादीला मदत करण्याच्या हेतुने सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादी माझी आत्या असल्याने मी साक्ष देण्यास आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमक्ष मारहाणीची कोणतीही घटना घडली नव्हती तसेच माझ्यासमक्ष कोणतीही कथीत पंचनाम्याची कार्यवाही करण्यात आली नव्हती.

**उलटतपास पुर्ण. फेरतपास काहीही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,
*स्वाक्षरी/-*

दि.१०.०६.२०२४

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.